ई- ४४५४९९३/२०२०/ मु.स.का.

मुख्य सचिव कार्यालय
दिनांक ०८ ऑक्टोबर, २०२०

विषय:- कोवीड-१९ चा वाढता प्रादुर्भाव टाळण्यासाठी जनसामान्यात जनजागृतीसाठी व्यापक मोहिम राबविण्याबाबत. (Campaign for COVID Appropriate Behavior)

दिनांक ०७.१०.२०२० रोजी मंत्रीमंडळाच्या बैठकीत राज्यातील कोवीड प्रादुर्भाव व उपाययोजना याबाबत आढावा घेण्यात आला. या बैठकी दरम्यान Campaign for COVID Appropriate Behavior या मोहिमेबाबतची माहिती मंत्रीमंडळाला देण्यात आली. यामध्ये मास्कचा वापर, शारिरिक अंतर व हातांची स्वच्छता (Wear Mask. Follow Physical Distancing, Maintain Hand Hygiene) या त्री-सुत्रीवर भर देण्याकरीता मोठ्या प्रमाणात जनजागृती करणे प्रस्तावित आहे, तसेच आरोग्य सेतूचा वापर, आयुष मंत्रालयाकडून शिफारस करण्यात आलेल्या प्रतिकार क्षमता वाढविणाऱ्या औषधांचा वापर करण्याबाबत तसेच सणासुदीच्या दिवसांमध्ये घ्यावयाची विशेष काळजी याबाबत जनजागृती करण्यावर भर देण्याचे सूचित करण्यात आले.

अ.मु.स. उच्च व तंत्र शिक्षण यांचे कार्यालय Gen. 792 13/10/2020

यासाठी राज्यातील सर्व जिल्हे, तालुके, ग्रामस्तरावरील शासकीय/निम शासकीय/ स्थानिक स्वराज्य संस्था/कार्यालये, आंगणवाडी, पोलीस स्टेशन, शिधा वाटप दुकाने, बी-बियाणे व खत विक्री दुकाने, सार्वजनिक शौचालये, तसेच इतर सर्व सार्वजनिक ठिकाणी या जागृती मोहीमेची भित्ती पत्रके व बॅनर्स लावणे, सर्व शासकीय संकेतस्थळांच्या लॅण्डींग पेजवर या मोहीमेबाबतची माहिती व घोषवाक्ये प्रसारित करणे, विविध कार्यालयांकडून देण्यात येणाऱ्या बिले/रिसीट/पत्र व्यवहारवर यावर मोहीमेचे घोषवाक्य/माहिती देणे. यासाठी लक्षवेधक घोषवाक्ये, टॅग लाईन, जिंगल, थिम सॉंग, ॲनिमेटेड व्हिडीओ व कोवीड शपथ इ. द्वारे व्यापक जनजागृती करणे आवश्यक आहे. यामध्ये राज्य शासनाच्या विविध प्रशासकीय विभाग, त्यांच्या अधिनस्त कार्यालये, खाजगी कार्यालये, औद्योगिक व व्यापारी आस्थापना, स्थानिक/प्रसिध्द कलाकार, खेळाडू, धर्मगुरू, लोकप्रतिनिधी यांचे सहकार्य घेऊन, ही मोहीम राबविणे आवश्यक आहे. तसेच राज्यातील विविध कामाचे टेंडर, जाहिराती इ. सर्व बाबींवर या मोहीमेचे घोषवाक्य/टॅग लाईन वापरण्याचे प्रस्तावित असून ही मोहीम राबविण्यासाठी विभिन्न विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय कार्यालये यांचा सहभाग तसेच त्यांच्याकडून अपेक्षित कार्यवाहीसाठी मा. मंत्रीमंडळाने निर्देशित केले आहे. त्यानुसार संबंधीत विभागांनी करावयाच्या कार्यवाहीचा विभागनिहाय तपशिल सोबतच्या तक्ता-अ मध्ये देण्यात आला असून त्याप्रमाणे संबंधित विभागांनी तात्काळ कार्यवाही करावी.

सर्व कार्यालयांना / विद्यापीठांना अग्रेषित

उस (सा.शि.)

( सीताराम कुंटे )
मुख्य सचिव

**अपर मुख्य सचिव** (गृह/ग्राम विकास/पाणी पुरवठा व स्वच्छता/ परिवहन व बंदरे/शालेय शिक्षण व क्रीडा व युवक कल्याण/ सार्वजनिक बांधकाम/ उच्च व तंत्र शिक्षण विभाग)

**प्रधान सचिव** (सहकार/पणन/नगर विकास/ माहिती व तंत्रज्ञान /गृहनिर्माण/ सार्वजनिक आरोग्य)

**सचिव** (महिला व बाल विकास/कृषि/माहिती व जन संपर्क/वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग)

तक्ता-अ

## कोवीड-१९ चा वाढता प्रादुर्भाव टाळण्यासाठी जनसामान्यात जनजागृतीसाठी व्यापक मोहिम राबविण्याबाबत संबंधित विभागांनी करावयाच्या कार्यवाहीचा तपशिल

| अ.क्र. | विभागाचे नाव | अपेक्षित कार्यवाहीचा तपशिल |
|---|---|---|
| १ | कृषी विभाग/ सहकार व पणन विभाग | बी-बियाणे व खत दुकानाबाहेर तसेच शेत/आठवडी बाजार, सहकारी संस्था, गृहनिर्माण संस्था इ. बाहेर उपरोक्तनुसार जनजागृती करणे. (उदा. भित्ती पत्रके, बॅनर्स इ.) |
| २ | ग्राम विकास विभाग | ग्रामीण स्तरावरील सर्व स्थानिक स्वराज्य संस्था (जिल्हा परिषद, पंचायत समिती, राप),इंदिरा आवास, पी.एम. आवास याच्या दर्शनी भागावर जनजागृती विषयक माहिती प्रसिध्द करणे तसेच या विभागाच्या अधिपत्याखालील लोकप्रतिनीधी, अधिकारी व कर्मचाऱ्यांमार्फत मोहीमेची प्रभावी अंमलबजावणी करणे. बचत गट व अशासकीय समाजसेवी संस्था यांनाही सहभागी करून घेणे |
| ३ | गृहनिर्माण विभाग/ नगर विकास विभाग/ सार्वजनिक बांधकाम विभाग/ परिवहन विभाग/ गृह विभाग | सर्व शासकीय वसाहती/इमारती, सर्व परिवहन व्यवस्था, बस, ऑटो रिक्शा, रेल्वे, मेट्रो, दुध केंद्रे, तुरूंग, पोलीस ठाणे इ. ठिकाणी मोहीमेच्या जनजागृतीसाठी आवश्यक ती कार्यवाही करणे. |
| ४ | शालेय शिक्षण व क्रीडा विभाग/ उच्च व तंत्र शिक्षण विभाग | शाळा, महाविद्यालये, क्रिडा संकुले, आय.टी.आय. शैक्षणिक संस्था इ. तसेच एनएसएस, स्काऊट गाईड, एनसीसी स्वयंसेवक तसेच शिक्षक व मुख्याध्यापक यांच्या सहकार्याने मोहीमेबाबत जनजागृती करणे. |
| ५ | महिला व बाल विकास विभाग | आंगणवाडी, बाल सुधार केंद्र, अनाथ आश्रम इ. ठिकाणी मोहीम राबविण्याबाबत आवश्यक त्या उपाययोजना करून मोहीमेबाबत जनजागृती करणे. |
| ६ | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | सार्वजनिक स्वच्छता गृहे, पाणी पुरवठा केंद्र इ. ठिकाणी मोहीम राबविण्याबाबत आवश्यक त्या उपाययोजना करून मोहीमेबाबत जनजागृती करणे. |
| ७ | माहिती व तंत्रज्ञान विभाग/ माहिती व जन संपर्क विभाग | सर्व शासकीय संकेतस्थळांवर/सीएससी (आपले सरकार) मोहीम राबविण्याबाबत आवाहन व आवश्यक त्या उपाययोजना करून माहिती उपलब्ध करून देणे. विविध प्रसार माध्यमांतून दृक-श्राव्य स्वरूपात तसेच लिखित स्वरूपा मोहीमेबाबत जनजागृती करणे. |
| ८ | सार्वजनिक आरोग्य विभाग/ वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग | कोवीड-१९ बाबत जनजागृतीबाबत सर्व प्रकारची रुग्णालये, केंद्रे, शासकीय प्राथमिक आरोग्य केंद्र, उप वैद्यकीय/शुश्रुषा/दंत महाविद्यालये/योग केंद्र, ॲम्ब्युलन्स, मंत्रालयाकडून शिफारस करण्यात आलेल्या रोग प्रतिकारक औषधांच्या वापराबाबत जनजागृती करणे. राज्यातील सर्व आरोग्य अधिकारी/कर्मचारी/आशा वर्कर्स/आरोग्य सेवक फिरते दवाखाने इ. ठिकाणी मोहीम राबविण्याबाबत आवश्यक त्या उपाययोजना करून मोहीमेबाबत जनजागृती करणे. आयुष सेविका यांच्या सहकार्याने मोहीम राबविणे. |